नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २९/११/२०२५ (शनिवार )**

## आगामी नगर परिषद /नगर पंचायत निवडणुक २०२५ चे अनुषंगाने नागपुर ग्रामीण जिल्हयात ड्रोन पेट्रोलींग सुरू

**आगामी नगर परिषद /नगर पंचायत निवडणुक २०२५** चे अनुषंगाने निवडणुक दरम्यान कोणताही अनुचितप्रकार घडणार नाहीत तसेच निवडणुक प्रक्रीया शांततेत पार पडतील याकरीता मा. श्री. हर्ष ए. पोद्दार,पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण यांचे आदेशान्वये नागपूर ग्रामीण जिल्हा पोलीस यांनी जिल्हयातील ६ उपविभागात नागपुर, उमरेड, कन्हान, रामटेक, सावनेर आणि काटोल उपविभागात **ड्रोन द्वारे दिवसा आणि रात्री पेट्रोलींग सुरू केली आहे.** निवडणुक कालावधीत अवैध दारू आणि अवैध पैसे वाटपावार ड्रोन पेट्रोलींग द्वारे लक्ष ठेवण्यात येणार आहे. जिल्हयातील संवेदनशिल गावात प्रभावीपणे लक्ष ठेवण्यासाठी ड्रोन पेट्रोलींग करण्यात येणार आहे. **ड्रोन पेट्रोलींग मतदानाच्या दिवशी पर्यंत सुरू राहणार आहे.**











# मा. जिल्हाधिकारी, नागपुर आणि मा. पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी आगामी निवडणुक अनुषंगाने पोलीस स्टेशन सावनेर आणि काटोल हद्दीतील संवेदनशिल मतदान केंद्र आणि स्ट्रॉग रूम येथे दिली भेट

आगामी नगर परिषद/नगर पंचायत सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या अनुषंगाने आज दिनांक २९/११/२०२५ रोजी मा. श्री विपीन इटनकर, जिल्हाधिकारी, नागपुर आणि मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांनी सावनेर आणि काटोल येथील प्रशासकिय अधिकारी यांची बैठक घेवुन आगामी निवडणुकीसंदर्भात स्ट्रॉग रूम सुरक्षेबाबत, मतदानाच्या दिवशी गर्दीचे नियोजन करून मतदान प्रक्रिया शांततेत तसेच सुरळीत पार पाडण्याबाबत सुचना दिल्या. तसेच मतमोजनी बाबत सुध्दा संबधीतांना महत्त्वाच्या सुचना दिल्या.

मा. जिल्हाधिकारी आणि मा. पोलीस अधिक्षकांनी काटोल आणि सावनेर येथील संवेदनशिल भाग तसेच मतदान केंद्राना भेट दिली. तसेच दोन्ही ठिकाणी स्ट्रॉग रूमला भेट देवुन सुरक्षा उपाययोजना तापासुन संबधीतांना महत्त्वाच्या सुचना दिल्या.

सदर भेटी दरम्यान मा. श्री विपीन इटनकर, जिल्हाधिकारी, नागपुर,मा. श्री हर्ष पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या उपविभागिय अधिकारी, उपविभागिय पोलीस अधिकारी, तहसिलदार, मुख्याधिकारी, पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी तसेच इतर अधिकारी हजर होते.


Katol - 441302



# अवैधरित्या विनापरवाना विदेशी दारूची वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद, सावनेर पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन सावनेर**:— दिनांक २८/११/२०२५ सावनेर पोलीसांना गुप्तबातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, पांढऱ्या रंगाच्या चारचाकी एम. एच.०४ एच. एफ. १२०८ वाहनामध्ये **अवैधरीत्या विदेशी दारूची वाहतुक केली** जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे सावनेर पोलीस नमुद वाहनाच्या शोध घेत असतांना करीत असतानं मौजा मानकर पेट्रोलपंप जवळ सावनेर येथे एम. एच. ०४ एच एफ १२०८ या वाहनाचा अपघात झाल्याची माहीती पोलीसांना मिळाली. पोलीस तात्काळ सदर घटनास्थळी पोहचुन नमुद वाहनाची पंचासमक्ष पाहणी केली असता त्यात वेगवेगळया कपंनीची विदेशी दारू मिळुन आली. आरोपी **१) निखील रामेश्वर वाघमारे, वय ३३ वर्षे,रा. वार्ड क्र ३ गणेशनगर बोरगाव मेघे जि.वर्धा २) साहील बडवाईक अंदाजे, वय २५ वर्षे, रा. सेलु जि. वर्धा ,हे अवैधरीत्या विदेशी दारूची वाहतुक करतांना मिळुन आले**. नमुद आरोपीतांना अधिक विचारपुस केली असता **मध्यप्रदेश येथुन माल आणल्याचे सांगितले.** पोलीसांनी पंचासमक्ष १) officer choice blue whisky च्या एकुन २० पेटया बॅक्स किमत १९१,०४०/— रूपये,२) royal stag whisky च्या एकुन १३ पेटया किमती १६२२४० /— रूपये ३) officer choice च्या एकुन ५ मोठया कॅरीबग मध्ये ४८ बॉटलस् असुन किमती ४०,८०० /— रूपये, ४) old monk rum या एकुन २ पेटया किमती १७,२८० /— रूपये आणि ५) पांढया रंगाची मारूती स्विफट कार गाडी क्रमाक एम ,एच,०४ एच एफ १२०८ किमती ३,००,०००/— रूपये असा एकुण किंमती ७,११,३६० /— **रुपयांचा मुददेमाल जप्त केला आहे.**

**नमुद आरोपी विरूध्द पोलीस स्टेशन सावनेर येथे महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**



## जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद १८ गोवंश जनावरांची सुटका,बुटीबोरी पोलसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन बुटीबोरी** :— दिनांक २८/११/२०२५ रोजी बोरी पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, नागपुर कडुन बुटीबोरी कडे आयशर वाहन क्रमांक एम. एच. ४० सी. एम. ०३३७ ने अवैधरित्या गोवंश जनावरांची वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी नागपुर ते हैद्राबाद महामार्ग, शनि मंदीर जवळ, बुटीबोरी येथे नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान वाहन क्र एम एच ४० सी एम ०३३७ येताना दिसले. पोलीसांनी वाहन थांबविण्याचा इशारा केला असता यातील चालकाने पोलीसांना पाहुन दुर अंतरावर वाहन थांबवुन अंधाराचा फायदा घेत पळुन गेला. पोलीसांनी पंचासमक्ष वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये १८ गोवंश जनावरे (बैल) मिळुन आले. नमुद जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, अंत्यत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन,शिंगाला व पायाला आखुड दोरखंडाने बांधुन वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले. पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून एक आयशर ट्रक क्रमांक एम एच ४०

सी एम ०३३७ किंमती २०,००,०००/— रूपये आणि १८ गोवंश जनावरे किंमती २,१६,००० /— रूपये असा एकुण किंमती २२,१६,०००/— रूपयाचा मुददेमाल जप्त केला. सुटका केलेल्या जनावरांना निराश्रीत गोवंश सेवा फाउंडेश, जैन गौशाळा, राउळगाव येथे देखभालीकरीता दाखल करण्यात आले आहे.

नुमद प्रकरणी आरोपी वाहन चालक आणि मालक यांच्या विरूध्द प्राण्यांचा छळ प्रतिबंध अधिनियम, महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम ,भान्यासं अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## पोलीस स्टेशन कुही हद्दीतील सराईत गुन्हेगार ईश्वर उर्फ वाली मधुकर कांढारकर याला एम.पी.डी.ए कायदया अंतर्गत केले स्थानबध्द

पोलीस स्टेशन कुही अंतर्गत राहणारा सराईत आरोपी **नामे ईश्वर उर्फ वाली मधुकर कांढारकर , वय ३३ वर्षे, रा साळवा, ता.कुही जि नागपुर** याचेवर दुखापत, अवैध जुगार, अवैध दारू या सारखे अनेक गंभीर गुन्हे नोंद असुन तो असे गुन्हे करण्याच्या सवयीचा आहे. त्याच्या असमाजिक कृत्याची माहीती पोलीसांना देणाऱ्या लोकांमध्ये तो भय निर्माण करून दहशत पसरवित असतो. नागपुर ग्रामीण पोलीसांना त्याचेविरूध्द जेव्हा जेव्हा तक्रारी प्राप्त झाल्या त्या त्या वेळी गंभीर दखल घेवुन त्याचे विरूध्द गुन्हे नोंद केले व त्याला अटक केले आहे. तसेच त्याचेवर वेळोवेळी प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु आरोपी नामे ईश्वर उर्फ वाली मधुकर कांडरकर याने आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली. आरोपीचे कृत्य समाजिक सुव्यवस्थेला बाधक ठरत असल्याने मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली कुही पोलीसांकडुन एम.पी.डी.ए कायदयान्वये कार्यवाही करण्यात आली. मा. जिल्हाधिकारी ,नागपुर यांच्याकडील स्थानबध्दतेच्या आदेशान्वये दिनांक २८/११/२०२५ रोजी सराईत आरोपी ईश्वर उर्फ वाली मधुकर कांढारकर याला मध्यवर्ती कारागृह नागपुर येथे दाखल केले.



**ईश्वर उर्फ वाली मधुकर कांढारकर**

## पोलीस स्टेशन सावनेर हद्दीतील गोवंश तस्करी करणारा गुन्हेगार समीर सलीम कुरेशी याला एम.पी.डी.ए कायदया अंतर्गत केले स्थानबध्द

पोलीस स्टेशन सावनेर अंतर्गत राहणारा सराईत आरोपी नामे **समीर सलीम कुरेशी, वय २७ वर्षे, रा कुरेशी मोहल्ला, कसाईपुरा, सावनेर, जि नागपुर** याचेवर गोवंश तस्करीचे गुन्हे नोंद आहे. तो असे गुन्हे करण्याच्या सवयीचा आहे. त्याच्या असमाजिक कृत्याची माहीती पोलीसांना देणाऱ्या लोकांमध्ये तो भय निर्माण करून दहशत पसरवित असतो. नागपुर ग्रामीण पोलीसांना त्याचेविरूध्द जेव्हा जेव्हा तक्रारी प्राप्त झाल्या त्या त्या वेळी गंभीर दखल घेवुन त्याचे विरूध्द गुन्हे नोंद केले व त्याला अटक केले आहे. तसेच त्याचेवर

वेळोवेळी त्याचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु आरोपीने आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली. आरोपीचे कृत्य समाजिक सुव्यवस्थेला बाधक ठरत असल्याने मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली सावनेर पोलीसांकडुन एम.पी.डी.ए कायदयान्वये कार्यवाही करण्यात आली. मा. जिल्हाधिकारी ,नागपुर यांच्याकडील स्थानबध्दतेच्या आदेशान्वये दिनांक २८/११/२०२५ रोजी सराईत आरोपी **समीर सलीम कुरेशी**, मध्यवर्ती कारागृह नागपुर येथे दाखल केले.



**समीर सलीम कुरेशी**

## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे,दारू बाळगुण विक्री, वाहतुक तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध २८ गुन्हे नोंद. ९ लाख ३९ हजरांचा मुद्देमाल जप्त

दिनांक २८/११/२०२५ दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू काढणारे तसेच दारू बाळगुन विक्री तसेच सेवन करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, मोहाफुल दारू, **मोहाफुल सडवा, मिली विदेशी दारू, वाहने,**तसेच इतर साहीत्य असा **एकुण ९,३९,३१०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.**

पोलीस स्टेशन कन्हान येथे १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन बेला येथे १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन बोरी येथे १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन नरखेड येथे ३ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन काटोल येथे २ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन जलालखेडा येथे १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन कोंढाळी येथे १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन उमरेड येथे १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन कुही येथे ३ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन कळमेश्वयेथे ६ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन सावनेर येथे १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन केळवद येथे २ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन अरोली येथे १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन देवलापार येथे ४ गुन्हे नोंद आहे. महाराष्ट्र दारू बंदी अधिनियम अन्वये एकुण २८ नोंद केले आहे.

**सदर कारवाईत ६४८० मिली देशी दारू, ७०४ लीटर मोहाफुल दारू, ३००० लीटर मोहाफुल सडवा, ३४५८० मिली विदेशी दारू, वाहने, तसेच इतर साहीत्य असा एकुण ९,३९,३१०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. नाशवंत मुद्देमाल पंचानामा कारवाई करून नष्ट करण्यात आला आहे.**

## नागपुर ग्रामीण जिल्ह्यातील ६६३ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक २९/११/२०२५ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व २१ पोलीस स्टेशनला

शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. एकुण ६६३ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बुटिबोरी येथे ३० आरोपी, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३३ आरोपी अशा एकुण ९३ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ३३ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २९ आणि पोलीस स्टेशन वेलतुर ३० आरोपी अशा एकुण १२२ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :—** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ३२ आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे ३५ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे २९ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३१ आरोपी अशा एकुण १२७ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३३ आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे ३४ आरोपी अशा एकुण ६७ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :—** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे ३४ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३२ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे २५ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे येथे २३ आरोपी अशा एकुण ११४ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :—** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ३९ आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ४३ आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे २८ आरोपी अशा एकुण १४० रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**(सर्व ६ उपविभागातील सर्व २१ पोलीस स्टेशन येथे एकुण ६६३ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे. )**



मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने